# महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग

**केंद्र क्र. १, १३ वा मजला, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, कुलाबा, मुंबई ४०० ००५.**
**दूरध्वाीः ०२२-२२१६ ३९६४/६५/६९ फॅक्सः ०२२-२२१६ ३९७६.**
**ई-मेलः mercindia@mercindia.org.in**
**वेब-साईट- www.mercindia.org.in**

## जाहीर सूचना

### दि टाटा पॉवर कंपनी लि. यांच्या ग्राहकांनी द्यावयाच्या आकारांच्या प्रारुप अनुसूचीवर सूचना/अभिप्राय पाठविणेबाबत

विद्युत अधिनियम, २००३ च्या कलम १८१ व इतर तरतूदींखाली महाराष्ट्र विद्युत नियामक आयोगाने, मविनिआ (विद्युत पुरवठा संहिता आणि पुरवठ्याच्या इतर अटी) विनियम, २००५ अधिसूचित केले आहेत. विद्युत पुरवठा संहितेच्या विनियम १८.१ मध्ये, विनियम अधिसूचित केल्याच्या दिनांकापासून एक महिन्याच्या आत "आकारांची अनुसूची" आयोगास मंजूरीसाठी सादर करण्याची तरतूद आहे. तसेच, अशी अनुसूची तपासल्यावर आयोग (अ) त्यास आपली मंजूरी देईल किंवा (ब) लेखी कारणे नमूद करून आकारांची अनुसूची नामंजूर करेल, अशीही तरतूद आहे.

२. विद्युत पुरवठा संहितेच्या विनियम १८.१ नुसार दि टाटा पॉवर कंपनी लि. यांनी, त्यांच्या दिनांक २ मे, २००५च्या प्रतिज्ञापत्राने ग्राहकांनी द्यावयाच्या आकारांची प्रारुप अनुसूची, आयोगोकडे मंजूरीसाठी सादर केली आहे.

३. दि टाटा पॉवर कंपनी लि.चा प्रस्ताव अंतर्भूत असलेल्या जाहीर दस्तऐवजाच्या विनामूल्य प्रती, लेखी विनंतीद्वारे, (प्रत्यक्ष किंवा पोस्टाने), खालील पत्त्यावर **दिनांक २ सप्टेंबर, २००६** पासून मिळू शकतील-

**दि टाटा पॉवर कंपनी लि., रेग्युलेशन्स डिपार्टमेंट, कॉर्पोरेट सेंटर (ए),**
**३४ संत तुकाराम रोड, कर्नाक बंदर, मुंबई-४०० ००९**

संबधित प्रस्ताव दि टाटा पॉवर कंपनी लि.च्या <www.tatapower.com > या वेबसाईटवर उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे. वरील जाहीर दस्तऐवज आयोगाच्या

कार्यालयात आणि तसेच त्याच्या www.mercindia.org.in या वेबसाईटवर देखील उतरवून घेण्याच्या स्वरुपात उपलब्ध आहे.

४. दि टाटा पॉवर कंपनी लि.च्या प्रस्तावावर **अभिप्राय व सूचना** (मराठी किंवा इंग्रजीत)-

- प्रत्यक्ष किंवा पोस्टाने किंवा फॅक्सने- लेखी निवेदनाद्वारे
- ई-मेल द्वारा
- जाहीर सुनावणीच्या वेळी लेखी किंवा तोंडी. (सूचना आणि अभिप्राय पाठविणा-याने आयोगाने त्याचे म्हणणे समक्ष ऐकून घ्यावे अशी इच्छा असल्यास, वरील लेखी निवेदनात तसा उल्लेख करावा.)

सचिव, महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग, यांना दिनांक **१८ सप्टेंबर, २००६** पर्यंत मिळतील अशा रितीने, १३वा मजला, केंद्र क्र. १, जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५, या पत्त्यावर पाठवाव्यात.

५. सूचना/अभिप्राय पाठविणा-याने आपले पूर्ण नांव व पोस्टाचा किंवा ई-मेलचा पत्ता नमूद करावा. सूचना/अभिप्राय एखाद्या संस्थेच्या किंवा ग्राहक वर्गातर्फे करण्यात येत असल्यास, तसे त्यात नमूद करण्यात यावे.

६. लेखी निवेदनाची एक प्रत दि टाटा पॉवर कंपनी लि.च्या नियामक कक्षाला वरील पत्त्यावर पाठविण्यात यावी.

७. या बाबत, जाहीर सुनावणी मुंबई येथे दिनांक **२१ सप्टेंबर, २००६** रोजी **दुपारी** ३.०० वाजता **व्हिस्टा हॉल, ३०वा मजला, केंद्र क्र. १,** जागतिक व्यापार केंद्र, कफ परेड, मुंबई-४०० ००५, येथे घेण्यात येईल व या **जाहीर सुनावणीत,** आक्षेप घेणा-यास त्याचे म्हणणे समक्ष मांडण्याची इच्छा असेलल्या प्रत्येकास, त्याचे म्हणणे मांडण्याची संधी देण्यात येईल व त्यासाठी वेगळी सूचना पाठाविण्यात येणार नाही.

(मालिनी शंकर)
सचिव,
**महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग**

**दिनांक- ३१ ऑगस्ट, २००६**